# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

सूचना का अधिकार

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,
जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.
Website- www.sic.maharashtra.gov.in
दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल केलेले द्वितीय अपिल**

**क्र.रामाआ नाशिक/द्वितीय अपिल क्र.६६०/२०१२/जळगाव**

| अपिलार्थी | प्रतिवादी |
|---|---|
| | जन माहिती अधिकारी |
| श्री. दिलीप तुकाराम निकम,<br>रा.लक्ष्मीछाया अर्पाटमेंट,फ्लॅट नं.११, शिवाजी चौक,<br>पाथरवट लेन, पंचवटी, ता.जि.नाशिक ४२२००३. | ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी,<br>ग्रामपंचायत कार्यालय,कुंझर, ता. चाळीसगाव,<br>जि. जळगाव |

<u>खुलासा सुनावणी दिनांक १९/१२/२०२५</u>

अपिलार्थी यांनी दिनांक १४/०९/२०११ रोजीच्या माहिती अर्जान्वये, जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कुंझर, ता. चाळीसगांव यांच्याकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन ग्रामपंचायत कुंझर येथील घर नं. ४२५ अ. नं. ४९५ या मिळकतीबाबत माहिती मागितली होती. परंतु जन माहिती अधिकारी यांच्याकडून ३० दिवसांच्या विहीत मुदतीत माहिती प्राप्त झाली नसल्याने, सदर माहिती अर्जासंदर्भात अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले होते. अपिलार्थी यांनी आयोगास सादर केलेल्या द्वितीय अपिल क्र. ६६०/२०१२ संदर्भात दिनांक २०/०६/२०१३ रोजी झालेल्या सुनावणीअंती आयोगाने दिनांक २०/०६/२०१३ रोजी अन्वये खालीलप्रमाणे आदेश पारीत केलेले आहेत.

*१. अपिलकर्ता यांचे अपिल क्र. ६६०/२०१२ अंशत: मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री. अरुण देशमुख यांनी अपिलकर्त्यास पुन्हा दिनांक १४/०९/२०११ च्या माहितीच्या अर्जाची संपूर्ण माहिती विनामूल्य व्यक्तीश: किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.*

*२. प्रस्तुत प्रकरणात तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. ए. एम. राठोड यांच्याकडे ग्रामसेवक पदाचा कार्यभार होता. परंतु त्यांनी अपिलकर्त्यास ३० दिवसांच्या मुदतीत माहिती दिलेली नाही म्हणून त्यांच्या विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करु नये याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत सादर करावा.*

२. आयोगाच्या उक्त आदेशाच्या अनुषंगाने आयोगासमोर दिनांक १९/१२/२०२५ रोजी आयोजित खुलासा सुनावणीसाठी अपिलार्थी, अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

३. सुनावणीवेळी उपस्थित अपिलार्थी यांनी प्रस्तूत प्रकरणी लेखी निवेदन सादर केले असून त्यात असे नमूद केले आहे की, अपिलार्थी यांनी माहितीच्या अधिकाराखाली दि.१४/९/२०११ रोजी रजिस्टर पोस्टाने अर्ज श्री.अरुण रंगराव देशमुख यांनी दि.१६/०९/२०११ रोजी अर्ज प्राप्त झाला. घरातील वडीलोपार्जित

मिळकती संदर्भात माहिती मागविली होती. परंतु त्यांनी ३० दिवसाच्या मुदतीत उत्तर दिले नाही व त्यांनी ७(१) चा भंग केला आहे.

अपिलार्थी यांनी श्री.नाना ज्योतीराम सुतार व तुकाराम ज्योतीराम सुतार यांच्या नावावर असलेल्या वडिलोपार्जित घर नं-४२५ अनुक्रमांक-४९५ अशी मिळकत असलेले घर तुकाराम ज्योतीराम सुतार यांच्या नावावर होते परंतु सदरची मिळकत सुमनबाई तुकाराम सुतार यांच्या नावावर कुठल्या आधारावर करण्यात आली. त्यासाठी सुमनबाईने कोणकोणती कागदपत्रे दाखल केलेली आहेत. या संदर्भात माहितीच्या अधिकाराखाली अर्ज केला होता त्यासाठी योग्य ते शुल्क रुपये १००/- ही मनीऑर्डरने पाठवले होते. सदरचे शुल्क स्वीकारुनही आजपावेतो अपिलार्थी यांना माहिती देण्यात आलेली नाही.

अपिलार्थी प्रस्तुत माहिती संदर्भात सुमारे १६ वर्षापासुन अविरत पत्रव्यवहार न्यायालय/ पोलिस ठाणे/ मंत्रालय तसेच नवी दिल्ली/औरंगाबाद मुंबई सर्वोच्च/उच्च न्यायालय यात तसेच सबंधित कार्यालये, माहिती आयुक्त कार्यालयामध्ये वक्तशिरपणे आपले-मोलमजूरीचे काम सोडून पाठपुरावा करीत आहे.

माहिती आयोगातुन संचिका नष्टीकरण/ गहाळ करणे संबंधित अरुण रंगराव देशमुख बनावट कागदपत्रे दाखल करणे मा.डॉ. दिपक डी पाटील यांचे वैद्यकिय प्रमाणपत्र बनावट आहे व ती बनावट कागदपत्रे माहिती आयोगाकडुन प्राप्त होत आहे.

श्री. अरुण रंगराव देशमुख हे भ्रष्ट कर्मचारी असल्याचे पुरावे सोबत आहे. प्रस्तुत कागदपत्रे पाहुन माहिती अधिकार २००५ अधिनियम मधील १९(ख) नुसार रुपये १ वर्ष-३१५ दिवस * १६ वर्ष = ५०४० दिवस = सरासरी मजुरी १०००/- ५०,४०,०००/- सबंधित प्रधिकरणाकडुन नुकसान भरपाई वसुल करणे बाबत आदेश पारीत करावे व त्याच बरोबर अरुण रंगराव देशमुख यांच्या वैयक्तिक मालमत्तेवर टाच आणुन नुकसान भरपाई पुर्ण करावी.

तसेच, सुनावणीवेळी उपस्थित **जन माहिती अधिकारी अे. एम. राठोड** यांनी खुलासा सादर केला असून त्यात असे नमूद केले आहे की, "विनंती पुर्वक खुलासा सादर करतो की, अपीलार्थी श्री. दिपक तुकाराम निकम रा. पंचवटी नाशिक यांचे व्दितीय अपील सुनावणी दिनांक २०/०६/२०१३ रोजीच्या निर्णयानुसार अपिलार्थी श्री.दिलीप तुकाराम निकम रा. पंचवटी, नाशिक यांना माहिती २००५ अन्वये संपुर्ण माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. अरुण रंगराव देशमुख यांनी दिली आहे. आपल्या आदेशाचे तंतोतंत पालन करण्यात आलेले आहे. तसेच माझ्याकडे कुंझर ग्रामपंचायतीचा चार्ज नव्हता. माझी तात्पुरती बदली गट विकास अधिकारी,पंचायत समिती चाळीसगाव यांनी केली होती. त्यामुळे माझा खुलासा नम्र पुर्वक सादर करीत आहे."

सुनावणीवेळी उपस्थित **जन माहिती अधिकारी श्री.अरूण रंगराव देशमुख** यांनी खुलासा सादर केला असून त्यात असे नमूद केले आहे की, "अपिलार्थी श्री. दिलीप तुकाराम निकम रा.पंचवटी नाशिक यांचे व्दितीय अपिल सुनावणी दि.२०/०६/२०१३ रोजीच्या निर्णय आदेशानुसार अपिलार्थी श्री. दिलीप तुकाराम निकम रा. पंचवटी,नाशिक यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये मागीतलेली संपूर्ण माहिती पुरविण्यात आलेली आहे. आपल्या आदेशाचे पालन करण्यात आलेले आहे. त्याबाबत आपल्याकडे देखील अवगत करण्यात आलेले आहे. तरी माझा खुलासा मान्य होण्यास नम्र विनंती आहे. "

४. सुनावणीदरम्यानचा युक्तीवाद व प्रस्तुत नस्तीवरील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या दि.१४/०९/२०११ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कुंझर, ता. चाळीसगांव यांनी विहित मुदतीत कोणतेही उत्तर अथवा माहिती अपिलार्थी यांना दिलेली नाही.

मात्र आयोगाच्या आदेशानंतर विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कुंझर, ता. चाळीसगांव यांनी अपिलार्थी यांना माहिती पुरविली असल्याचे त्यांनी त्यांच्या उक्त खुलाश्यामध्ये नमूद केले आहे.तसेच, व्दीतीय अपील सुनावणीवेळी उपस्थित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कुंझर, ता. चाळीसगांव श्री.अरूण

देशमुख यांचा अपघात झाल्यामुळे अपिलकर्त्यास माहिती ३० दिवसांत पुरविता आली नाही व त्यांचा ग्रामसेवक पदाचा कार्यभार श्री.राठोड यांचेकडे असल्याबाबत त्यांनी कथन केले होते.

तसेच, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.राठोड यांनी त्यांच्या खुलाश्यात नमूद केले आहे की, माझ्याकडे कुंझर ग्रामपंचायतचा चार्ज नव्हता माझी तात्पुरती बदली गट विकास अधिकारी,पंचायत समिती, चाळीसगांव यांनी केली होती.

उपरोक्त सर्व वस्तुस्थिती विचारात घेता, असे निदर्शनास येते की,माहितीचा अधिकार अधिनियम कलम २०(१) मधील तरतूदीप्रमाणे माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून कलम ७ च्या पोटकलम(१) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या विहीत मुदतीत अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नाही, यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर शास्ती करणेसंबंधात आदेशित केले आहे. सुनावणीवेळी उपस्थित तत्कालीन /विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कुंझर, ता. चाळीसगांव यांनी आयोगास सादर केलेल्या लेखी खुलाश्यावरून अपिलार्थी यांच्या दिनांक १४/०९/२०११ च्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने विहीत मुदतीत माहिती न पुरविण्यास तत्कालीन तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी हे दोघेही संबंधित असल्याचे निदर्शनास येते. सबब, प्रस्तूत प्रकरणी संबंधित तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कुंझर, ता. चाळीसगांव **श्री. अरुण रंगराव देशमुख व श्री. अे. एम. राठोड** यांचा माहितीचा अधिकार अधिनियम कलम २०(१) मधील १ परंतूकाची प्रक्रीया पूर्ण करणेसाठी लेखी खुलासा घेणे संयुक्तीक राहील.

सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) प्रस्तूत प्रकरणातील जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कुंझर, ता. चाळीसगांव श्री. अे. एम. राठोड यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम २०(१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा सदर आदेश प्राप्तीनंतर १५ दिवसाच्या आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

२) प्रस्तूत प्रकरणातील जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कुंझर, ता. चाळीसगांव श्री.अरुण रंगराव देशमुख यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम २०(१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा सदर आदेश प्राप्तीनंतर १५ दिवसाच्या आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

३) वरील निर्देशांसह प्रस्तूत द्वितीय अपिल क्र. **६६०/२०१२/जळगाव** निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(भूपेन्द्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-

प्रत -माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

गट विकास अधिकारी,पंचायत समिती,ता.चाळीसगाव,जि.जळगाव यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच, आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी करून अहवाल १५ दिवसांच्या आत सादर करावा.

जावक क्र. १०४८ — 12 FEB 2026